महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.७१/पदभरती/का-४** **दि.१९-०८-२०२३**

## परिपत्रक क्र. २३

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील विविध ७७२ पदे भरण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दिनांक १६/०२/२०२३ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हता व अनुभवानुसार जास्तीत जास्त पदांकरिता अर्ज करण्याची संधी उपलब्ध व्हावी, केवळ परीक्षा शुल्कामुळे उमेदवारांची संधी वाया जाऊ नये, याकरिता पदाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार जाहिरातीमधील पदांची Group-A, Group-B व Group-C मध्ये विभागणी करण्यात आली असून प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र परीक्षा शुल्क न आकारता Group निहाय परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे.

प्रत्येक Group करिता असलेल्या सामायिक परीक्षेचा स्तर भिन्न स्वरुपाचा असल्याने उमेदवार एकापेक्षा जास्त Group मधील पदांकरिता अर्ज करण्यास इच्छूक असल्यास त्याने त्या-त्या Group मधील संबंधित पदाकरिता स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने काही उमेदवारांनी एकापेक्षा जास्त पदांकरिता अर्ज केलेले आहेत. तथापि, शैक्षणिक अर्हता व अनुभवानुसार किती पदांकरिता अर्ज करावयाचे यांचे संपूर्ण स्वातंत्र्य उमेदवारास होते. विहित परीक्षा शुल्कासह विहित कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून दिनांक १६/०४/२०२३ रोजी घेण्यात आलेल्या सामायिक परीक्षेकरिता (CBT) परवानगी देण्यात आली होती.

जाहिरातीमधील निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदांकरिता व्यावसायिक चाचणी (CBT-२) असल्याने सदर पदे वगळता उर्वरित सर्व पदांची (Group-B व Group-C) तात्पुरती गुणवत्ता यादी (Provisional Merit List) दिनांक ०१/०८/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त पदांकरिता अर्ज केलेले आहेत अशा उमेदवारांनी त्या-त्या Group करिता असलेली सामायिक परीक्षा (CBT) स्वतंत्रपणे दिलेली असल्याने अशा उमेदवारांचा त्यांच्या गुणवत्तेनुसार संगणकीकृत पद्धतीने तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या गुणवत्ता यादीत समावेश आहे.

यानंतर उमेदवारांची निवड सूची प्रसिद्ध करुन निवड सूचीतील उमेदवारांच्या प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Documents Verification) ची कार्यवाही करण्यात येणार आहे. तात्पुरत्या गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम हा उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर करताना भरलेल्या माहितीच्या आधारे निश्चित करण्यात आला आहे. तथापि, प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Documents Verification) दरम्यान उमेदवाराने ऑनलाईन अर्जात चूकीची माहिती सादर केल्याचे आढळून आल्यास/उमेदवार संबंधित प्रमाणपत्र/कागदपत्र सादर करु न शकल्यास/ पडताळणीअंती उमेदवाराचे प्रमाणपत्र/कागदपत्र (यात अनुभव प्रमाणपत्राचा देखील समावेश आहे) खोटे/बनावट आढळून आल्यास त्यास पुढील भरती प्रक्रियेकरिता अपात्र ठरविण्यात येणार आहे. तसेच याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**ज्या उमेदवाराची प्रमाणपत्र/कागदपत्र (यात अनुभव प्रमाणपत्राचा देखील समावेश आहे) पडताळणी अंती वैध ठरतील अशा उमेदवारांनाच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी अंती जरी एखादा उमेदवार एकापेक्षा जास्त पदांकरिता पात्र ठरला तरी उमेदवार ज्या पदांकरिता पात्र ठरला आहे त्यापैकी ज्या पदावर रुजू होण्यास तो इच्छूक असेल त्या पदाचेच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.**

तथापि, उमेदवारांनी खोटी/बनावट अनुभव प्रमाणपत्रे सादर करुन ८-८ पदांकरिता अर्ज केलेला असून त्यांची नांवे तात्पुरत्या गुणवत्ता यादीतून वगळण्यात यावीत याकरिता काही उमेदवारांनी ई-मेल/अर्ज केले आहेत. एखाद्या उमेदवाराने दुसऱ्या उमेदवारांबाबत तक्रार केली तरी केवळ त्या तक्रारीच्या आधारे प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी पूर्वीच त्या उमेदवारांची नांवे गुणवत्ता यादीतून वगळणे उचित होणार नाही. प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी दरम्यान उमेदवाराने सादर केलेली प्रमाणपत्र/कागदपत्र खोटी/बनावट आढळल्यास त्यास पुढील भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येते. **सदर पदभरतीच्या अनुषंगाने अद्याप उमेदवारांच्या प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Documents Verification) ची कार्यवाही झालेली नसल्याने प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी दरम्यान उमेदवाराने सादर केलेली प्रमाणपत्र/कागदपत्र खोटी/बनावट आढळल्यास त्यास पुढील भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.**

काही उमेदवारांनी ७७२ पदांच्या भरतीत घोटाळा, प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीपूर्वी अशा उमेदवारांचे अनुभव प्रमाणपत्र तपासण्यात यावे, या संदर्भात खंडपीठात याचिका दाखल करण्यात येईल अशा आशयाची चूकीची व दिशाभूल करणारी माहिती प्रसिद्ध करुन तसेच पदभरतीच्या कार्यवाहीबाबत Social Media वर अफवा पसरवून पदभरती प्रक्रियेस विलंब करण्याचा/पदभरती प्रक्रिया रद्द करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत असल्याची बाब संचालनालयाच्या निदर्शनास आली आहे.

**संचालनालय स्तरावरुन करण्यात येत असलेली पदभरती प्रक्रिया ही पूर्णपूणे पारदर्शक स्वरुपाची असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा घोटाळा झालेला नाही. पदभरती प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून त्रयस्त एजन्सीमार्फत परीक्षा घेण्यात आली आहे. परीक्षेदरम्यान होणारे गैरप्रकार रोखण्याकरिता खाजगी व पोलीस सुरक्षा व्यवस्था, Iris Scanner, Mobile Jammer यासारख्या अद्ययावत यंत्रणांचा वापर करण्यात आला आहे.**

**पदभरतीमधील प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया अद्याप झालेली नसतांना तत्पूर्वीच काही उमेदवाराची नांवे गुणवत्ता यादीतून कमी करण्याबाबत प्रसिद्धी माध्यमांमध्ये चूकीची व दिशाभूल करणारी माहिती प्रसिद्ध करुन अफवा पसरविणे उचित नाही.**

**तरी पदभरतीसंदर्भात चूकीची व दिशाभूल करणारी माहिती प्रसिद्ध न करण्याचे तसेच अशा अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून करण्यात येत आहे.**

स्वाक्षरीत/-
(दि. अं. दळवी)
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.